# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून बसमार्ग क्र. ९३ डेक्कन जिमखाना ते पिंपळे निलख पूर्ववत सुरू

पीएमपीएमएल कडून बसमार्ग क्रमांक ९३ - डेक्कन जिमखाना ते पिंपळे निलख हा बसमार्ग प्रवाशी मागणीनुसार पूर्ववत सुरू करण्यात आला असून स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून दिनांक १५/०८/२०२४ रोजी आमदार मा. श्रीमती अश्विनीताई जगताप यांच्या हस्ते या बसमार्गाचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्ष मा. श्री. शंकरराव जगताप, श्री. सचिन साठे, श्री. नितीनशेठ इंगवले व बालेवाडी डेपो मॅनेजर श्री. सुनिल दिवाणजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

बसमार्ग क्रमांक ९३ - डेक्कन जिमखाना ते पिंपळे निलख या बससेवेचा मार्ग फर्ग्युसन कॉलेज, मनपा काँग्रेस भवन, सिमला ऑफिस, पुणे विद्यापीठ गेट, कस्तुरबा गांधी वसाहत, औंध गांव, औंध हॉस्पिटल, रक्षक चौक असा असणार आहे. या बसमार्गावर पिंपळे निलख ते डेक्कन जिमखाना ८ फेऱ्या व डेक्कन जिमखाना ते पिंपळे निलख ८ फेऱ्या अशा एकूण १६ फेऱ्या होणार आहेत. पिंपळे निलख हून पहिली फेरी सकाळी ०६.१५ वा. तर शेवटची फेरी संध्याकाळी ०७.२० वा. आहे. तसेच डेक्कन जिमखाना पहिली हून पहिली फेरी सकाळी ०७.०० वा. तर शेवटची फेरी रात्रौ ०८.४५ वा. आहे.

सदर कार्यक्रमास ज्येष्ठ नागरीक संघटनेचे अध्यक्ष श्री. सुरेश साठे, श्री. रामदास जगदाळे, श्री. बाळासाहेब इंगवले, श्री. राजेंद्र टकले, श्री. अशोक शिंदे, श्री. जयवंत रानवडे, श्री. बाळासाहेब कामठे, श्री. भुलेश्वर नानगुडे, श्री. काळूराम नानगुडे, श्री. अनिल संचेती, श्री. आनंद कुंभार, श्री. प्रकाश कामठे, श्री. लक्ष्मण दळवी, श्री. शिवाजीराव दळवी यांच्यासह पिंपळे निलख परिसरातील नागरीक उपस्थित होते.

तरी या बससेवेचा लाभ नोकरदार, कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक व महिला प्रवाशांनी घ्यावा, असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करणेत येत आहे.

---

दि. १६/०८/२०२४

मा. संपादक,<br>
दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

Sd/-

कामगार व जनता संपर्क अधिकारी<br>
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.